**MHKO100001062023**

**नियमीत दिवाणी दावा क्र.४१/२०२३ मधील निशाणी क्र. ३३ वर आदेश**
**(धोंडीबा घुगरे वि. नाना घुगरे )**

प्रतिवादी क्र. ४ व ६ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द अनुक्रमे झालेला "विना कैफीयत व एकतर्फा ” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ वयस्कर असून दरम्यानचे काळात आजारी असल्याने त्यांना वकिलांना भेटून कागदपत्रे दाखवून कैफियत दाखल करता आली नाही. तसेच प्रतिवादी क्र.६ या देखील मुंबई येथे राहण्यास असल्याने त्यांना वकिलांमार्फत हजर होता आले नाही. प्रतिवादी क्र.४ व ६ यांनी कैफियत देण्यास जाणुनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादी दाव्यातील आवश्यक पक्षकार असून त्यांना त्यांची कैफियत देणे अत्यंत न्यायाचे व निकडीचे आहे. कैफियत दाखल दाखल करून घेतल्यास व एकतर्फा आदेश रद्द केल्यास वादीचे काही नुकसान होणार नाही. परंतु तसे न झाल्यास प्रतिवादी यांना न्यायापासून वंचित होवून त्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, न्यायाचे हितास्तव योग्य ते आदेश पारीत करण्यात यावेत.

**३.** प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ४ हे दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर न्यायालयात दिनांक ०९.०२.२०२३ रोजी हजर झाले. त्यांनी विहीत

मुदतीत कैफियत दिली नसल्याने त्यांचेविरूध्द विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०३/०९/२०२५ रोजी दाखल केला आहे. तसेच दाव्याची समन्स बजावणी होवूनही प्रतिवादी क्र.६ न्यायालयात हजर न राहिल्याने त्यांच्याविरूध्द एकतर्फा आदेश दिनांक ३०.०३.२०२४ रोजी पारीत केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.६ यांचेविरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ व ६ यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.४ व ६ यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी क्र.४ व ६ यांच्या अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र. ४ यांनी आपली कैफीयत दाखल करणेस व प्रतिवादी क्र. ६ यांनी दाव्यात हजर होण्यास बराच उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ व ६ यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी क्र.४ व ६ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ६००/- (अक्षरी रुपये सहाशे) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. ६ विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो.

**३)** प्रतिवादी क्र. ४ व ६ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.४ व ६ यांची निशाणी ३३ च्या अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2025.09.20
14:58:34 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १९/०९/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज.